अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# काँग्रेसने परिवारवादाच्या पडद्यातून बाहेर यावे

इतक्या दारुण पराभवानंतरही काँग्रेस कोणताच धडा घ्यायला तयार नाही. निवडणुकीनंतर काँग्रेसच्या कार्य समितीची बैठक दिल्लीत झाली. त्यात पराभवाची खंत व्यक्त करण्याऐवजी सोनिया आणि राहुल गांधी यांच्याविषयी निष्ठा दाखवण्याचेच काम झाले.पक्षनिष्ठेपेक्षाही या दोघांविषयी व्यक्त झालेल्या बैठकीतल्या भावना आश्चर्यकारक म्हणाव्या लागतील. सव्वाचारशे जागा जिंकणारा काँग्रेस पक्ष आज थेट ४४ जागांवर घसरला. काँग्रेसच्या इतिहासामध्ये हा सर्वात मोठा पराभव ठरतो. आता या पराभवातून काँग्रेसला तितकेच मोठे बदल करावे लागतील. कारण या निवडणुकीतून भारतीय जनता पार्टीला अभूतपूर्व यश मिळाले असले तरी मोदींविषयी लोकांनी दिलेला कौल हा अधिक महत्त्वाचा ठरतो. काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत पराभवाचा फार मोठा विचार झाला असे नाही. कदाचित पुढच्या सहा सात महिन्यामध्ये काँग्रेसमध्ये काही ना काही बदल घडतील.

प्रामुख्याने काँग्रेस कार्यकारिणीची पुनर्रचना होऊ शकते. राष्ट्रीय पातळीवरून जिल्हा पातळीपर्यंत नवे पदाधिकारी नेमले जाऊ शकतात.परंतु आज सर्वात मोठा प्रश्न असा निर्माण झाला आहे की काँग्रेसचे नेतृत्व नेमके कोणाकडे राहणार आहे. आठ दहा महिन्यापूर्वीच राहुल गांधी यांना पक्षाचे उपाध्यक्षपद बहाल केले गेले. लोकसभा निवडणुकीचे स्टार कँपेनर म्हणून त्यांच्यावर जबाबदारी सोपवली गेली. आणि तेच उद्याचे पक्षाध्यक्ष आणि निवडणुकीत जर यश मिळाले असते तर तेच काँग्रेसचे पंतप्रधानपदाचे उमेदवार राहिले असते. ज्या राहुल गांधींकडे इतक्या मोठ्या जबाबदाऱ्या सोपवण्याची मानसिक तयारी काँग्रेस पक्षाने केली होती. त्याच राहुल गांधींचे नेतृत्व लोकसभा निवडणुकीमध्ये सपशेल अपयशी ठरलेले आहे. काँग्रेसला शंभर जागा जरी मिळाल्या असत्या तरी या पक्षाची थोडीफार लाज राखली गेली असती. परंतु मोदी यांच्या छुप्या लाटेने काँग्रेसला पन्नास जागांच्या आतच बंदिस्त व्हावे लागले. ज्या राहुल गांधींकडे निवडणुकीच्या प्रचाराची आणि एकूणच पक्षाविषयी प्रमुख जबाबदारी होती.त्यांचे नेतृत्व पक्षासाठी फारसे फलदायी ठरलेले नाही.आणि आज काँग्रेस पक्ष कठोर आत्मपरीक्षण करून हे सत्य स्वीकारायला तयार नाही. वस्तुस्थिती डोळ्यासमोर दिसत असताना केवळ गांधी कुटुंबाच्या प्रभावाखाली किंवा त्यांची नाराजी ओढवून घ्यायची नाही किंवा पक्ष गांधी कुटुंबाशिवाय जगूच शकत नाही. अशी याच पक्षातल्या लोकांची समजूत असल्यामुळे हे सत्य स्वीकारण्याचे धाडस दाखवत नाहीत.

### या निवडणुकीतून नवी समीकरणे

भारतातल्या निवडणुका लोकशाही पध्दतीने होतात.मग तीच लोकशाही राजकीय पक्षांच्या अंतर्गत कारभारातही असली पाहिजे. पराभवाची मिमांसा करताना जर त्यांच्याकडे नेतृत्व होते तेच कुचकामी ठरले असेल तर अशा नेतृत्वाला लोकशाही मार्गानेच काही काळ विश्रांती घ्यायला सांगितले पाहिजे.आता काँग्रेसचा पराभव जितका मोदी लाटेमुळे झालेला आहे तितकाच तो काँग्रेस पक्षांतर्गत असलेल्या गांधी कुटुंबाच्या निष्ठेमुळेही झाला आहे. पक्षाचा हा एकखांबी तंबू या पुढच्या काळात पक्षाला भरभक्कम यशाची खात्री देऊ शकणार नाही. कारण या लोकसभा निवडणुकीने केवळ भाजपाचा विजय झाला आहे असे नाही तर अनेक राजकीय नवी समीकरणे पुढे आली आहेत. राजकीय पक्षांना आपापले अनेक संदर्भ तपासून पाहावे लागणार आहेत. केवळ राजकीय स्वार्थ साधण्याकरता आपापली घराणी चालवण्याकरता पिढीजात सत्ता बळकावण्याकरता राजकारण करणाऱ्यांनासुध्दा या निवडणुकीने धडा शिकवला आहे. या निवडणुकीत संपूर्ण देशभरात छोट्या मोठ्या स्वरुपात असलेल्या जवळपास तेराशे पक्षांचा पराभव झाला. यावरून या निवडणुकीतले राजकीय संदर्भ लक्षात येतात. भविष्यकाळात तर देशात राष्ट्रीय पातळीवर जास्तीत जास्त दोन किंवा तीनच प्रमुख पक्ष टिकून राहतील.

आता निवडून आलेल्या भाजपा सरकारने जर सक्षमपणे कारभार केला तर काँग्रेस आणि भाजपा अशा दोन प्रमुख राष्ट्रीय पक्षांचाच भविष्यकाळात प्रभाव राहू शकेल. भारतीय जनता पार्टी अजून तरी पक्षांतर्गत लोकशाही काही प्रमाणात पाळते. या पक्षात एकाच व्यक्तीचे किंवा घराण्याचे स्तोम माजवले जात नाही.या पक्षाचे अनेक नेते आपल्या मुलामुलींना तिकिटे मिळावीत म्हणून फारसा प्रयत्न करताना दिसत नाहीत. मात्र या पक्षालादेखील ही राजकीय घराणेशाही हळूहळू मोडून काढावी लागेल.

या संदर्भात विचार केला तर भाजपाशी टक्कर द्यायची असेल तर काँग्रेसला आपले संघटन मजबूत करावे लागेल. पक्षाध्यक्षपद गांधी घराण्याकडे उपाध्यक्षपदही गांधी घराण्याकडे असा मर्यादित विचार सोडून द्यावा लागेल. कर्तृत्व आणि क्षमता असलेल्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना संधी द्यावी लागेल. पक्षांतर्गत घराणेशाहीपेक्षा लोकशाहीचे महत्व वाढवावे लागेल.हाच मोठा धडा या निवडणुकीने काँग्रेस पक्षाला दिला आहे. खरे तर सोनिया किंवा राहुल या दोघांपैकी कोणीतरी पदावरून बाजुला व्हायला हवे होते. नव्याने पक्षाची रचना करण्याची गरज त्यातून व्यक्त होईल.तरच लोकांचा देखील थोडाफार विश्वास प्राप्त करता येऊ शकेल.

### संघटन मजबूत करावे लागेल

काँग्रेस पक्षाने घराणेशाहीचा हा मुखवटा टाकून देण्याची वेळ आलेली आहे. आता काळ बदललेला आहे.या निवडणुकीने नवे राजकीय निकष पुढे आणले आहेत. पराभवाच्या निमित्ताने जो काही कालावधी काँग्रेसला मिळेल त्यातून पक्षाचे संघटन मजबूत करता येईल. तयार असलेले पक्षाचे जाळे लोकशाही पध्दतीनेच मजबूत करता येईल. राहुल गांधी यांनाच पक्षाला नेतृत्वपदी बसवायचे असेल तर त्यांनी जरूर तसे करावे. परंतु यासाठी राहुल गांधी यांना अजूनही बरीच तयारी करावी लागणार आहे. आणि त्यांच्या जोडीला तरुण नेत्यांची फळी उभी करावी लागणार आहे.या निवडणुकीत भाजपा कार्यकर्त्यांनी विजयासाठी मोदींचे मुखवटे तोंडासमोर लावले होते.

परंतु काँग्रेस पक्षात दोनच मुखवटे असल्यामुळे बाकीच्यांना कोणती संधीच उरत नाही. कार्यकर्त्यांना आपणदेखील मोदी आहोत असे वाटायला लागणे आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये देखील गांधी घराणे म्हणजे काँग्रेस असे न वाटता आपण स्वत:देखील काँग्रेसचे नेते आहोत. असे परिवर्तन घडवून आणावे लागेल. गेली साठ सत्तर वर्षे काँग्रेस पक्ष एका परिवाराच्या पडद्याआड काम करतो आहे. तो दूर करण्याची हीच संधी या पक्षाला मिळाली आहे.